D:\pp\KANDALVAN\KANDALVAN Noting & Letter. (Autosaved).docx

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग

हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनी क्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्स क्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/४७८/२०२० 1940 दिनांक:- १३/०१/२०२०.

प्रति,
मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,३०२ बेक फिल्ड हाऊस, ,
तिसरा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
आवक - 631
दिनांक - 25/08/2020.
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

**विषय:- कांदळवन वेबसाईटवर प्राप्त तक्रारीबाबत**
**Dumping of city waste on Mangrove.**
**( श्री.दिपेश यशवंत म्हात्रे )**

WFH

अर्जदार श्री.दिपेश यशवंत म्हात्रे यांनी उरण तालुक्यातील मोरा रोड बोरीपाखाडी येथील कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडून या कार्यालयाकडील पत्र क्रमांक मशा/ जमीन/ अ-०३/कांदळवन/तक्रार/सुनिल आगरवाल/२०१९,दि.१६/११/२०१९ अन्वये अहवाल मागविण्यात आला होता. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी तहसिलदार उरण यांचेमार्फत चौकशी करुन दिनांक ०१/०१/२०२० रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर केला आहे.

अर्जदार श्री.दिपेश यशवंत म्हात्रे, रा.बोरीपाखाडी ता.उरण तालुक्यातील मोरा रोड बोरीपाखाडी येथील कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबतचा ई-मेलव्दारे या कार्यालयाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने यापूर्वीच दि.२२/११/२०१९ रोजी परिक्षेत्र वन अधिकारी उरण, मंडळ अधिकारी उरण, तलाठी सजा उरण तसेच, श्री.बी.एन.कुमार, श्री.नंदकुमार पवार व मोरा येथील रहिवासी यांचेसमवेत संयुक्त स्थळपाहणी करण्यात आली असून उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे कार्यालयास अहवाल प्राप्त आहे. सदरचे अहवालानुसार आजमितीस नमूद ठिकाणी कांदळवनाचा नाश झाल्याचे आढळून आलेले नसल्याचे तहसिलदार उरण यांचे अहवालावरुन दिसून येते.

सदर ठिकाणी कांदळवनाचा नाश झाल्याचे आढळून न आल्याने अर्जदार यांची तक्रार निकाली काढण्यांत यावी असे वाटते.

सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील चौकशी अहवाल, मंडळ अधिकारी उरण यांचेकडील अहवाल, जबाब, पंचनामा व मागील ३ वर्षातील Google Images, MRSAC नकाशाच्या प्रती माहितीस्तव सोबत जोडल्या आहेत.

स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी यांचे सहीची असे.

close the case

Steno update the case

(विशाल दौंडकर)
तहसिलदार (महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड

DCF(Mangrove)

17/8